# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त कार्यालय

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in

MiraBhayandar @2047

जा.क्र. मनपा/आयुक्त / ०१९ /2024-25 दि. २५/07/2024

**प्रत्यायोजन आदेश**

**विषय :- "उपायुक्त" पदाच्या पदभाराबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील "उपायुक्त" यांचेकडे सोपविलेल्या विविध विभागांचे पदभाराबाबत यापूर्वी पारित केलेले सर्व आदेश याद्वारे अधिक्रमित करून सदरचे नव्याने आदेश पारित करणेत येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ अन्वये खालील दर्शविलेल्या खात्यांचे/ विभागांचे प्रशासन आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळ्या प्रकरणांत विविध तरतुदीखाली नमुद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्य, महानगरपालिका आयुक्तांचे सर्वसाधारण नियंत्रणसापेक्ष खालील उपायुक्त यांच्या नावाखाली दर्शविल्याप्रमाणे या आदेशान्वये सोपविण्यांत येत आहेत.

**अ) श्री. रवि पवार, उपायुक्त (मुख्यालय)**

१. सामान्य प्रशासन/आस्थापना
२. निवडणुक व जनगणना
३. अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मुलन व नियंत्रण
४. फेरीवाला धोरण व नियंत्रण
५. ई-टेंडरिंग, CCTV यंत्रणा
६. ग्रंथालय
७. मध्यवर्ती भांडार
८. पशुवैद्यकीय

**ब) श्री. सचिन बांगर, उपायुक्त**

१. घनकचरा व्यवस्थापन (दैनंदिन कचरा संकलन व घनकचरा प्रकल्प)
२. सुरक्षा
३. वाहन व यांत्रिकी
४. अभिलेख
५. क्लस्टर डेव्हलपमेंट
६. स्थानिक संस्था कर
७. विधी
८. अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन

**क) श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त**

१. उद्यान व वृक्ष प्राधिकरण
२. समाज विकास (NULM सह)

३. महिला व बाल कल्याण
४. बाजार लिलाव विभाग
५. जाहिरात
६. क्रिडा आणि सांस्कृतिक कार्य
७. परवाना
८. पर्यावरण

**क) श्री. प्रसाद शिंगटे, उपायुक्त**

१. शिक्षण
२. मालमत्ता व्यवस्थापन
३. मालमत्ता कर
४. वैद्यकिय आरोग्य विभाग
५. भुईभाडे
६. परिवहन
७. माहिती व तंत्रज्ञान
८. जनसंपर्क
९. पे अँड पार्क

संबंधित उपायुक्तांनी वरील विभागांचे कामकाज वेळोवेळी त्यांना प्रत्यायोजित केलेल्या आयुक्तांच्या वित्तीय व प्रशासकीय अधिकारांच्या मर्यादेत राहून पहावयाचे आहे. वित्तीय बाबींशी निगडीत सर्व प्रस्ताव/प्रकरण मंजूर करण्यापूर्वी मुख्यलेखाधिकारी व मुख्यलेखापरीक्षक यांची सहमती घ्यावी.

स्थायी समिती, महासभा अथवा केंद्र किंवा राज्य शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावयाचे सर्व प्रस्ताव आयुक्तांचे पूर्व मान्यतेने व मंजूरीनेच पाठविणे बंधनकारक राहील.

वरीलप्रमाणे संबंधित विभागांचे कामकाज पाहत असताना महानगरपालिका उपायुक्तांनी आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पाडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी ह्या सर्व प्रयोजनांसाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत; असे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ नुसार मानले जाईल.

**(संजय श्रीपतराव काटकर,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
१. **श्री. रवि पवार,** उपायुक्त (मु.)
२. **श्री. सचिन बांगर,** उपायुक्त
३. **श्रीम. कल्पिता पिंपळे,** उपायुक्त
४. **श्री. प्रसाद शिंगटे,** उपायुक्त

प्रत :- माहितीस्तव.
१. अतिरिक्त आयुक्त (सर्व)
२. सर्व विभाग प्रमुख / खातेप्रमुख
३. आदेशनस्ती.